# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ई-बातमी/२०२२ दि. २२ फेब्रुवारी,२०२२

जळगाव दि.२२ (प्रतिनिधी) देशाच्या स्वातंत्र्यदिन अमृत महोत्सवानिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे ठरविले असून त्या अनुषंगाने आयोजन आणि नियोजन समितीची दुसरी बैठक मंगळवार दि.२२ फेब्रुवारी रोजी घेण्यात आली.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू प्रा.बी.व्ही.पवार होते. यावेळी व्यासपीठावर व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, दीपक पाटील, प्रभारी कुलसचिव प्रा.रा.ल.शिंदे, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी सोमनाथ गोहिल उपस्थित होते. प्रारंभी प्रभारी संचालक, विद्यार्थी विकास डॉ.सुनील कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील यांनी सभेस संबोधित करतांना सांगितले की, प्रत्येक महाविद्यालयाचा सहभाग महत्वाचा आहे. स्वातंत्र्य संग्रामात आदिवासी भागाचा खुप मोठा सहभाग आहे. स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचा सहभाग हा समोर आला पाहिजे. त्यासाठी आपण विविध कार्यक्रमांचे आयोजन करीत आहोत. या कार्यक्रमात सामाजिक संस्थांना सुध्दा सहभागी करून घेण्यात यावे. या बैठकीत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव वर्षनिमित्त विविध कार्यक्रमांचे घेण्याचे निश्चित झाले. त्यात निबंध, घोषवाक्य, नियतकालिक अंक, सामान्यज्ञान, इतिहास शोध, वादविवाद आदी स्पर्धा घेण्यात येणार आहेत. अल्प भाषीक स्पर्धेत खानदेशी भाषा, अहीराणी भाषा, तावडी भाषा, लेवा बोली भाषा अभ्यास व संशोधन करणे, राष्ट्रवंदना, युवा संसद, काव्य व साहित्य संमेलन, व्याख्यानमाला, वृक्षांची लागवड, स्वातंत्र्या विषयक माहिती संकलित करणे, माय व्हिलेज माय स्टोरी, जनजाती गौरव यात्रा, देशभक्तीपर गीत गायन, राष्ट्रभक्ती विषयावर चर्चासत्र, परिसंवाद, कवी संमेलन, पोवाडा, पोस्टरसादरीकरण, वक्तृत्व, चित्रकला, देशभक्ती विषयावर शॉर्ट फिल्म, डॉक्युमेंटरी, पथनाट्य एकांकिका, नवगीत लेखन आदी स्पर्धांसह वीरमाता, वीरपती सत्कार समारंभ, तिरंगा पदयात्रा तर एकाच दिवसी ७५ वेगवेगळया महाविद्यालयात ७५ व्याख्याने आयोजित करण्यात येतील असे ठरले. चर्चेत व्यस्थापन परिषद सदस्य प्राचार्य राजू फालक,प्रा. मोहन पावरा, विवेक लोहार, अधिसभा सदस्य सौ.पुनम गुजराथी,प्रा.अनिल पाटील, प्राचार्य संध्या सोनवणे, नितीन ठाकुर, प्रा.प्रकाश अहिरराव, दिनेश नाईक, अमोल सोनवणे, प्रा.मोहिनी उपासनी,प्रा.अजय पाटील, डॉ. पंकजकुमार नन्नवरे, क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटील, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी सोमनाथ गोहिल, संचालक राष्ट्रीय सेवा योजना डॉ. सचिन नांद्रे,यांनी सहभाग घेतला.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी